ePaper
वर्ष - 9 । अंक -57 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
www.mahaenews.com । रविवार दि. 19 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ओबीसी आरक्षण कमी झाल्याचा पुरावा आहे का? राधाकृष्ण विखे पाटील



### आतील पानांत

- बांगलादेशकडूनही चीतपट!
- माणसाच्या जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा
- पाकिस्तानचे अफगानवर हल्ले!
- अमेरिकेतील टॅरिफ तणाव कधी संपेल?

**धक्कादायक!** न्यायालयाच्या आदेशानंतर ४७ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

# साईभक्तांच्या पैशांवर डल्ला!

## शिर्डी साईबाबा संस्थानच्या ४७ कर्मचाऱ्यांनी केला ७७ लाखांचा गैरव्यवहार

। राहाता । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**शिर्डी येथील जगप्रसिद्ध श्री साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागात तब्बल ७७ लाख १३ हजार रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संस्थानातील विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसह एकूण ४७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर नोंदवण्यात आला असून, साईभक्तांच्या देणग्यांमधून जमा झालेल्या निधीचा गैरवापर झाल्याने भाविक वर्गात तीव्र संतापाचे वातावरण आहे.**




### संजय काळेंच्या पाठपुराव्यामुळे उघड झाला घोटाळा

या प्रकरणी कोपरगावचे सामाजिक कार्यकर्ते भास्करराव संजय काळे यांनी शिर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या दीर्घ पाठपुराव्यानंतर आणि उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अखेर शिर्डी पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

### उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर उघड झाला प्रकार

सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी साईबाबा संस्थानच्या प्रशासनाकडे विद्युत विभागातील गैरव्यवहारासंदर्भात तक्रार केली होती. मात्र, संस्थानकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली.

या याचिकेवरील सुनावणीनंतर न्यायालयाने १५ ऑक्टोबर रोजी स्पष्ट आदेश देत शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याचे निर्देश दिले. त्या आदेशाची अंमलबजावणी करत शुक्रवारी रात्री (१७ ऑक्टोबर) शिर्डी पोलिसांनी संबंधित ४७ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हा नोंदवला. या कारवाईनंतर साईबाबा संस्थान तसेच शिर्डी परिसरात खळबळ उडाली असून, संस्थानच्या आर्थिक पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

### विद्युत साहित्याच्या नोंदींमध्ये मोठा घोटाळा

संजय काळे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागात काम करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या जबाबदारीतील विद्युत साहित्याची योग्य नोंद डेडस्टॉक रजिस्टरमध्ये केली नाही. त्याऐवजी त्यांनी रजिस्टरमध्ये बनावट नोंदी करून विद्युत साहित्याची चोरी केली. नंतर जेव्हा लेखापरीक्षण झाले, तेव्हा या अनियमिततेचा पर्दाफाश झाला. लेखापरीक्षणात असे स्पष्ट झाले की, ७७ लाख १३ हजार रुपयांचे विद्युत साहित्य संस्थानच्या नोंदीत नसून, त्याचा अपहार करण्यात आला आहे. यामध्ये वायर, केबल, ट्रान्सफॉर्मर, लाईटिंग मटेरियल, इलेक्ट्रिक फिटिंग्ज आदी वस्तूंचा समावेश असल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे.

### ४७ आरोपींवर स्वतंत्र जबाबदारी निश्चित

या प्रकरणातील सर्व ४७ जणांवर स्वतंत्रपणे जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. लेखापरीक्षण अहवालानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याने त्यांच्या अखत्यारीतील वस्तूंचा अपहार केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

यापैकी ३९ आरोपींनी आपल्यावर निश्चित झालेली रक्कम संस्थानमध्ये परत जमा केली, तर ८ आरोपींनी अजूनही ती रक्कम भरलेली नाही. त्यामुळे या सर्व ४७ जणांनी संगनमत करून विद्युत साहित्य चोरी करून संस्थानचा आर्थिक गैरवापर केल्याचे स्पष्ट होते, असे फिर्यादीत म्हटले आहे.

पोलिसांकडून या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, खरेदी प्रक्रिया आणि वस्तूंची हालचाल यांची सखोल चौकशी केली जाणार आहे.

### संस्थानकडून तक्रारीकडे दुर्लक्ष

संजय काळे यांनी फिर्यादीत नमूद केले आहे की, "संस्थानकडे वारंवार तक्रार करूनही प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही. संस्थानातील अधिकारी एकमेकांचे संरक्षण करत होते. त्यामुळे आम्हाला न्यायालयाची मदत घ्यावी लागली."

उच्च न्यायालयानेही याची गंभीर दखल घेत 'तक्रारीवर कार्यवाही का झाली नाही?' असा सवाल प्रशासनाला विचारला. अखेर न्यायालयाच्या आदेशानंतरच पोलिसांनी प्रकरणाची नोंद घेतली. या पार्श्वभूमीवर साईबाबा संस्थानचे व्यवस्थापन आणि पारदर्शकतेबाबत नागरिकांमध्ये व भाविकांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### साईभक्तांचा रोष आणि संस्थानची प्रतिक्रिया

साईबाबा संस्थान हे देशभरातील भाविकांच्या श्रद्धास्थानांपैकी एक आहे. दरवर्षी कोट्यवधी भाविकांकडून देणग्या, सोनं, चांदी, रोख रक्कम आणि साहित्य संस्थानला प्राप्त होतं. या देणग्या योग्य कारणांसाठी वापरल्या जाव्यात, अशी साईभक्तांची अपेक्षा असते.

मात्र, या गैरव्यवहारामुळे "भाविकांच्या पैशांवरच डल्ला घातला गेला" अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. अनेक भाविकांनी सामाजिक माध्यमांवर संताप व्यक्त करत प्रशासनाच्या निष्क्रियतेवर टीका केली आहे. संस्थानकडून या प्रकरणी अद्याप अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार, "आरोपी कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव विचाराधीन" असल्याचे सांगण्यात आले आहे.

### संस्थानच्या प्रतिमेला धक्का

शिर्डी साईबाबा संस्थान हे महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत धार्मिक संस्थांपैकी एक आहे. दरवर्षी शेकडो कोटींच्या देणग्या या संस्थानला मिळतात. अशा ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार उघडकीस आल्याने संस्थानच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला आहे. भाविक आणि समाजकार्यकर्त्यांच्या मागणीनुसार या प्रकरणाचा सखोल व निष्पक्ष तपास होऊन दोषींना शिक्षा व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. साईभक्तांच्या श्रध्देचा गैरवापर करणाऱ्या ४७ कर्मचाऱ्यांवरील हा प्रकार केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून श्रद्धास्थानावरचा विश्वास हादरवणारा आहे. उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे सत्य उजेडात आले असले तरी, या प्रकरणातील पुढील तपास व कारवाईकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

गोळीबार प्रकरण

दारूगोळा कारखान्यातील अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार

# नीलेश घायवळच्या घरात ‘ॲम्युनिशन बॉक्स’

## ‘ब्ल्यू कॉर्नर’ नोटीस बजाविण्यात आली

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोथरूड गोळीबार प्रकरणातील आरोपी गुंड नीलेश घायवळ याच्या कोथरूडमधील घराच्या झडतीत काडतुसे, तसेच पुंगळ्यांसह काडतुसे ठेवण्याचे लाकडी खोके (ॲम्युनिशन बॉक्स) सापडले आहे. खडकीतील लष्कराच्या दारूगोळा कारखान्यातील हे खोके घायवळपर्यंत कसे पोहोचले? याद्दष्टीने पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून दारूगोळा कारखान्यातील अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.**



या प्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात घायवळ याच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घायवळ याच्याविरुद्ध आता सात गुन्हे दाखल झाले आहेत. तो सध्या युरोपात असून, त्याच्या प्रत्यार्पणासाठी पोलिसांकडून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलीस संस्थेशी (इंटरपोल) संपर्क साधण्यात आला आहे. घायवळला पकडण्यासाठी ‘ब्ल्यू कॉर्नर’ नोटीस बजाविण्यात आली आहे. त्याचे कोथरूडमधील श्री संत ज्ञानेश्वर कॉलनीत घर आहे. त्याच्या घराची झडती घेण्यात आली असता दोन काडतुसे, चार पुंगळ्या जप्त करण्यात आल्या. त्याच्या घरात काडतुसे ठेवण्याचे खोके सापडले आहे. हे खोके खडकीतील दारूगोळा कारखान्यातील असल्याचा संशय आहे. हे खोके रिकामे आहे. मात्र, हे खोके त्याच्यापर्यंत कसे पोहोचले, याद्दष्टीने तपास करण्यात येत आहे.

याबाबत दारूगोळा कारखान्यातील अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करण्यात आला असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.काडतुसे ठेवण्याच्या खोक्यावर २०१७ वर्ष असा उल्लेख आहे. खोक्यावर ५.५६ एमएम असे लिहिण्यात आले आहे. पोलिसांनी खोक्याची तपासणी केली. तेव्हा खोक्यात सत्तुर सापडला आहे. त्यात काडतुसे नव्हती. या खोक्यात एकावेळी ३०० काडतुसे बसतात, असी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. लष्कराच्या दारूगोळा कारखान्यातील खोके घायवळच्या घरापर्यंत कसे पोहोचले, याद्दष्टीने तपास सुरू आहे.

या प्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात घायवळ याच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खोक्यात सत्तुर सापडला

घायवळ याच्याविरुद्ध आता सात गुन्हे दाखल झाले आहेत. तो सध्या युरोपात असून, त्याच्या प्रत्यार्पणासाठी पोलिसांकडून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलीस संस्थेशी (इंटरपोल) संपर्क साधण्यात आला आहे. घायवळला पकडण्यासाठी ‘ब्ल्यू कॉर्नर’ नोटीस बजाविण्यात आली आहे.त्याचे कोथरूडमधील श्री संत ज्ञानेश्वर कॉलनीत घर आहे.

घायवळ याच्याविरुद्ध आता सात गुन्हे दाखल झाले आहेत. तो सध्या युरोपात असून, त्याच्या प्रत्यार्पणासाठी पोलिसांकडून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलीस संस्थेशी (इंटरपोल) संपर्क साधण्यात आला आहे.

घायवळला पकडण्यासाठी ‘ब्ल्यू कॉर्नर’ नोटीस बजाविण्यात आली आहे.त्याचे कोथरूडमधील श्री संत ज्ञानेश्वर कॉलनीत घर आहे.त्याच्या घराची झडती घेण्यात आली असता दोन काडतुसे, चार पुंगळ्या जप्त करण्यात आल्या. त्याच्या घरात काडतुसे ठेवण्याचे खोके सापडले आहे. हे खोके खडकीतील दारूगोळा कारखान्यातील असल्याचा संशय आहे. हे खोके रिकामे आहे. मात्र, हे खोके त्याच्यापर्यंत कसे पोहोचले, याद्दष्टीने तपास करण्यात येत आहे. याबाबत दारूगोळा कारखान्यातील अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करण्यात आला असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.काडतुसे ठेवण्याच्या खोक्यावर २०१७ वर्ष असा उल्लेख आहे. खोक्यावर ५.५६ एमएम असे लिहिण्यात आले आहे. पोलिसांनी खोक्याची तपासणी केली. तेव्हा खोक्यात सत्तुर सापडला आहे. त्यात काडतुसे नव्हती. या खोक्यात एकावेळी ३०० काडतुसे बसतात, असी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. लष्कराच्या दारूगोळा कारखान्यातील खोके घायवळच्या घरापर्यंत कसे पाोहोचले, याद्दष्टीने तपास सुरू आहे.

# सायकल स्पर्धेसाठी सर्वंकष आराखडा हवा

## चंद्रकांत पाटील यांची महापालिका प्रशासनाला सूचना

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी सर्वंकष आराखडा तयार करून दर्जेदार रस्त्यांची निर्मिती करावी,’ अशा सूचना राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी प्रशासनाला दिल्या. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या सूचनेनुसार महापालिकेच्या खात्याशी संबंधित विविध विकासकामांसंदर्भातील आढावा बैठक झाली, त्या वेळी पाटील बोलत होते.**



बैठकीला महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, बापूसाहेब पठारे, पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप आदी उपस्थित होते.पाटील म्हणाले, ‘आगामी काळात पुणे शहरात आंतरराष्ट्रीय पातळीवरील सायकल स्पर्धा होणार आहे. यासाठी आवश्यक दर्जाचे रस्ते तयार करण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाची आहे.

### दर्जेदार रस्त्यांची निर्मिती करावी

‘पीएमपीच्या ताफ्यात नव्याने समाविष्ट होणाऱ्या एक हजार बसच्या देखभाल-दुरुस्तीसह आर्थिक नियोजन करावे. पीएमपीला होणारा आर्थिक तोटा दोन्ही महापालिका भरून काढतात. आता पीएमपीने महापालिकांवर अवलंबून न राहता आर्थिक सक्षम झाले पाहिजे. कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग, वेतनातील फरक, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याचे नियोजन प्रशासनाने करावे,’ असेही मिसाळ म्हणाल्या.शहरात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी सर्वंकष आराखडा तयार करून दर्जेदार रस्त्यांची निर्मिती करावी

पावसामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. हे खड्डे बुजविण्यास प्रशासनाने प्राधान्य द्यावे. विविध विधानसभा मतदारसंघांतील खड्डे बुजविल्याचा अहवाल सर्व आमदारांना नियमितपणे उपलब्ध करून द्यावा. रस्ते विकासाचा सर्वंकष आराखडा प्रशासनाने तयार करावा.

प्रकल्प अहवाल सादर करावा,’ असे आदेश नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी बैठकीत दिले.

DPU SUPER SPECIALTY HOSPITAL
(A Unit of Dr. D.Y. Patil Medical College, Hospital & Research Centre)
PIMPRI, PUNE



डॉ. पी. डी. पाटील
कुलपती
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.) पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ)



डॉ. सौ. भाग्यश्रीताई पी. पाटील
प्र-कुलपती
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.) पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ)



डॉ. यशराज पी. पाटील
विश्वस्त खजिनदार
डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, (डी.पी.यू.) पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ)

# जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक सर्व सेवा सुविधांनी परिपूर्ण रुग्णालय

## अनुभवी तज्ञ् डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ आणि तत्पर उपचार उत्तम रुग्णसेवेसाठी आम्ही वचनबद्ध आहोत.




For more details, visit our website

- रोबोटिक सर्जरी सेंटर
- कृत्रिम गर्भधारणा व एन्डोस्कोपी सेंटर
- अवयव प्रत्यारोपण सेंटर
- हृदयरोग शस्त्रक्रिया
- TAVI क्लिनिक
- अत्यावश्यक वैद्यकीय सेवा
- मज्जासंस्था (न्यूरो) उपचार
- मूत्रविकार व मूत्रपिंड उपचार
- श्वसन व पोटाचे आणि त्वचारोग उपचार
- कॉक्लियर इम्प्लांट
- अस्थिरोग व रोबोटिक सांधेरोपण शस्त्रक्रिया
- माता आणि बाल विभाग (45 बेडस् चे नवजात अतिदक्षता विभाग व अत्याधुनिक स्वतंत्र प्रसूती संकुल)
- अत्याधुनिक रेडिओलॉजी विभाग

2011 बेड्स | 181 अतिदक्षता विभाग बेड्स | 32 अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह | 24 प्रशस्त ओपीडी

**मोफत प्रसूती (नॉर्मल डिलिव्हरी व सिझेरियन) ची सुविधा उपलब्ध.**

स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग व वेलनेस सेंटर | सुसज्ज आंतररुग्ण विभाग | PMJAY / MJPJAY / RBSK / CGHS / CSMA /ECHS /MPKAY / Central Railway / ESIS / Dhanwantari gold scheme PCMC / शहरी गरीब आरोग्य योजना PMC सर्व शासकीय व खाजगी विमा संरक्षण (इन्शुरन्स) तसेच कॉर्पोरेट कंपनीशी संलग्न आरोग्य विमा संरक्षण

कॉल सेंटर क्र: + 91 706 599 5999 | प्रायव्हेट ओ.पी.डी. क्र: 020-6711 6401
आपत्कालीन संपर्क: 020-6711 6469 | रुग्णवाहिका क्र: +91 888 080 2020
डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय आणि संशोधन केंद्र, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे - 411 018

info@dpuhospital.com | www.dpuhospital.com

## महापालिका निवडणुका प्रभागनिहाय मतदारयादी तयार करण्यास सुरुवात

# निवडणुकीच्या कामाला वेग; इच्छुकांचे देव पाण्यात!

## २८ नोव्हेंबरला अंतिम यादी प्रसिद्ध होणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. एकीकडे निवडणुकीच्या तयारीला प्रशासनाने वेग दिला असून, दुसरीकडे इच्छुक उमेदवारांचे राजकीय हालचालींना सुरुवात झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता प्रभागनिहाय मतदारयादी तयार करण्याचे काम जोरात सुरू झाले आहे.**



गेल्या आठवड्यात राज्य निवडणूक आयोगाने ३२ प्रभागांची नव्याने निश्चित झालेली सीमा जाहीर केली. या सीमांनुसार प्रत्येक प्रभागातील मतदारांची विभागणी आणि यादी तयार करण्याची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू आहे. राज्य निवडणूक आयोगाने यासाठी १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदारयादी आधारभूत धरून काम करण्याचे निर्देश दिले आहेत.

### ६ नोव्हेंबरला प्रारूप, २८ नोव्हेंबरला अंतिम यादी

या प्रक्रियेनुसार महापालिकेच्या संकेतस्थळावर ६ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर नागरिकांना त्यांच्या नावांची नोंद तपासण्यासाठी आणि दुरुस्ती/हरकत नोंदविण्यासाठी १४ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. प्राप्त हरकती आणि सूचना तपासून त्यानुसार सुधारणा केल्यानंतर २८ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल, अशी माहिती महापालिकेच्या निवडणूक विभागाने दिली.

या टप्प्यानंतर ४ डिसेंबर रोजी मतदान केंद्रांची यादी, तर १० डिसेंबरला मतदान केंद्रनिहाय मतदारयादी जाहीर केली जाईल, असे सहायक आयुक्त (निवडणूक) अविनाश शिंदे यांनी सांगितले.

### मतदारयादीतील पारदर्शकतेवर भर

गेल्या काही महापालिका निवडणुकांमध्ये मतदारयादीत गोंधळाचे अनेक प्रकार उघडकीस आले होते. काही प्रभागांमध्ये मतदारसंख्येत अनावश्यक वाढ झाली, तर काही ठिकाणी नागरिकांची नावे गहाळ असल्याचे समोर आले. या पार्श्वभूमीवर यंदा प्रशासन अधिक काटेकोरपणे आणि पारदर्शकतेने मतदारयादी तयार करण्याच्या तयारीत आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, "या वेळेस मतदारयादीतील सर्व नावे नवीन प्रभागरचनेनुसार व्यवस्थित समाविष्ट केली जातील. प्रारूप यादी जाहीर झाल्यानंतर नागरिकांनी आपली नावे, पत्ते आणि मतदान केंद्र तपासणे अत्यंत आवश्यक आहे. यादीत त्रुटी आढळल्यास ठराविक मुदतीत हरकत नोंदवावी, म्हणजे नंतर निवडणुकीच्या वेळी गोंधळ टाळता येईल."

### राजकीय इच्छुकांमध्ये हालचाल

प्रभागांची सीमा जाहीर झाल्यानंतर शहरातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवार आता आपले क्षेत्र निश्चित करून संघटन मजबूत करण्याच्या प्रयत्नात आहेत.

काही ठिकाणी नव्याने झालेल्या प्रभागरचनेमुळे जुनी मतदारसंघीय समीकरणे बदलली आहेत, त्यामुळे इच्छुक उमेदवार आपापल्या शक्यतांचा आढावा घेत आहेत.

निवडणुकीची तारीख अद्याप निश्चित नसली, तरी राज्य निवडणूक आयोगाच्या तयारीवरून निवडणूक प्रक्रिया पुढील काही महिन्यांत सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांचे देव पाण्यात असून, पक्षांमध्ये तिकीटाच्या चर्चेला देखील सुरुवात झाली आहे.

### नागरिकांसाठी सूचना

प्रभागनिहाय यादी तयार होत असताना नागरिकांनी स्वतःच्या नावाची नोंद योग्य प्रकारे झाल्याची खात्री करून घ्यावी, असे प्रशासनाने आवाहन केले आहे. महापालिकेच्या संकेतस्थळावर मतदारयादी उपलब्ध होणार असल्याने नागरिकांनी ती तपासून हरकत, नाव दुरुस्ती किंवा पत्त्यातील बदलासाठी आवश्यक अर्ज ठराविक कालावधीत दाखल करावेत. विरोधकांनीही मतदारयादीतील पारदर्शकतेवर भर देत प्रशासनावर सतत लक्ष ठेवण्याचे ठरविले आहे. प्रत्येक मतदाराचा हक्क सुरक्षित राहावा, आणि कोणतेही बनावट नाव यादीत येऊ नये, यासाठी

### निवडणुकीच्या तयारीला गती

महापालिकेच्या निवडणुकीकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, प्रशासनही निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व तयारी करत आहे. मतदारयादी अंतिम झाल्यानंतरच निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याची शक्यता आहे.

शहरात सध्या ३२ प्रभागांतून सुमारे ३० लाखांहून अधिक मतदार अपेक्षित आहेत. त्यापैकी प्रत्येकाचे नाव योग्य प्रभागात समाविष्ट व्हावे, हा प्रशासनाचा प्रयत्न आहे. पारदर्शक, त्रुटीरहित आणि अद्ययावत मतदारयादी हे यशस्वी निवडणुकीचे पहिले पाऊल ठरेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# भाजपा महायुती सरकारचे "दिवाळी गिफ्ट"

## टाळगाव चिखलीतील 5 एकर जागेत होणार तहसीलदार कार्यालय

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड अपर तहसील कार्यालयासाठी आता हक्काच्या जागेचा प्रश्न कायमस्वरुपी सुटला आहे. टाळगाव चिखली येथील 5 एकर जागा तहसील कार्यालयास उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाला राज्याच्या महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने मान्यता दिली. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याकामी सकारात्मक निर्णय घेतला. पिंपरी-चिंचवडकरांसाठी हक्काच्या जागेत तहसील कार्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

### विभागीय आयुक्तांच्या प्रस्तावाला महसूल नोंदणी विभागाची मान्यता

सुमारे 35 लाख लोकसंख्या असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराच्या अपर तहसीलदार कार्यालयासाठी जागेचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. त्यामुळे दोन-तीन ठिकाणी कार्यालय स्थलांतरीत करावे लागले. तहसीलदार कार्यालयासाठी हक्काची जागा मिळावी. त्याठिकाणी सुसज्ज तहसीलदार कार्यालय, निवासस्थान, नागरी सुविधा केंद्रसुद्धा उभारण्यात यावे. या करिता भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्याला अखेर यश मिळाले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीतही पिंपरी-चिंचवड शहराच्या तहसीलदार कार्यालयासाठी प्रस्तावित जागेचा प्रश्न मार्गी लावावा. याबाबत लक्ष वेधण्यात आले होते. याबाबत पुणे जिल्हाधिकारी प्रशासनाकडे जागेची मागणी करण्यात आली. महसूल आणि जिल्हा प्रशासनाच्या सकारात्मक अभिप्रायानंतर चिखली येथील स. नं. 539 येथील 5 जागा अपर तहसीलदार कार्यालय पिंपरी-चिंचवडसाठी मिळावी, असा प्रस्ताव पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाने राज्याच्या महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडे पाठवला होता. त्याला मान्यता मिळाली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३१ डिसेंबर २०१५ नुसार ज्या ठिकाणी राज्य शासनाचे रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पाकरीता शासकीय जमीन आवश्यक असेल तेथे अशा जमीनीचे भोगवटा मूल्य कितीही असले, तरी जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधित विभागास महसुल मुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील, असे नमुद केलेले आहे. या नियमाला अनुसरून जागा उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



"पिंपरी-चिंचवडकरांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला आता पूर्णविराम मिळाला आहे. टाळगाव चिखली येथे तहसील कार्यालयासाठी हक्काची ५ एकर जागा उपलब्ध झाल्यामुळे आता नागरिकांना सुसज्ज व कार्यक्षम सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हे यश सर्वसामान्य जनतेच्या पाठिंब्यामुळे आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे मिळाले आहे. लवकरच या ठिकाणी आधुनिक व सुसज्ज तहसील कार्यालय उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा उभ्या करण्यात येतील. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी मी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे पिंपरी-चिंचवडच्या लाखो नागरिकांना प्रभावी प्रशासकीय सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पिंपरी-चिंचवड शहराची वाटचाल शाश्वत विकासाच्या दिशेने सुरू आहे, याचे समाधान वाटते."

**-- महेश लांडगे,**
आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# सर्व काही ‘नीट’ सुरु आहे?



## भूमिका

**परीक्षेत गैरप्रकार झाल्याच्या आरोपांवरून संसदेपर्यंत घमासान चर्चा झडल्या, नीट’ परीक्षेबाबतचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी जाहीर केला. यंदाची ‘नीट’ रद्द होणार नाही आणि पुन्हा घेतलीही जाणार नाही,’ हे न्यायालयाने स्पष्ट केले. ‘नीट’च्या निकालात गैरप्रकार झाले किंवा पूर्ण यंत्रणेचेच पद्धतशीर उल्लंघन झाले, असा निष्कर्ष काढण्याएवढा सबळ पुरावा नाही.**



किंबहुना फेरपरीक्षा घेतल्यास त्याचा या विद्यार्थ्यांना फटका बसेल, असे न्यायालयाचेच निरीक्षण आहे. काही ठिकाणी पेपरफुटी झाल्याचे स्पष्ट झाले असले आणि त्यामुळे परीक्षेवर शंका घ्यायला वाव असला, तरी प्रामाणिकपणाने परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या त्यापेक्षा किती तरी जास्त असणार आहे. शिवाय, पेपरफुटी व्यापक होती, असेही सिद्ध होत नसल्याने पुन्हा नव्याने सगळी प्रक्रिया पार पाडणे फारच जिकिरीचे होऊन बसले असते. वैद्याकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या वेळापत्रकावर परिणाम होऊन पुढे यंदाच्या शैक्षणिक वर्षालाच बसू शकणारा फटका, आरक्षण असलेल्या विद्यार्थ्यांची होऊ शकणारी गैरसोय, भविष्यात वैद्याकीय व्यावसायिकांच्या उपलब्धतेवर होऊ शकणारा परिणाम आदी मुद्दे निरीक्षणांच्या स्वरूपात न्यायालयानेच मांडले आहेत. परिणामी, आला तो निकाल योग्यच.मात्र, या निकालामुळे परीक्षा व्यवस्थेबाबत निर्माण झालेले प्रश्न संपलेले नाहीत. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी न्यायालयाच्या निकालावर दिलेली प्रतिक्रिया ही त्या दृष्टीने तपासायला हवी. ‘विरोधक विद्यार्थ्यांची दिशाभूल करत होते,’ वगैरे म्हणणे राजकीयदृष्ट्या एक वेळ ठीक, पण ‘विरोधक अराजक माजविण्याचा प्रयत्न करत होते, त्यांनी देशाचा अपमान केला आहे,’ अशी पुष्टी जोडणे आततायीपणाचे.‘नीट’ पुन्हा घेण्यात यावी, या याचिकेवरील सुनावणीदरम्यान यंदाच्या ‘नीट’मध्ये झालेल्या गैरप्रकारांवर पुरेसा प्रकाश पडलेला असताना आणि तो केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागासारख्या केंद्र सरकारच्या अखत्यारीतीलच तपास संस्थेने मांडलेला असताना, त्याबाबत प्रश्न विचारणे हे विरोधकांचे कामच आहे. हजारीबागमध्ये पेपर फोडणाऱ्याने प्रश्नपत्रिका ठेवलेल्या शाळेच्या खोलीत प्रवेश करून तेथून प्रश्नपत्रिकेची छायाचित्रे काढून नंतर त्या प्रती कशा वितरित केल्या, याची साद्यांत माहिती केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानेच मंगळवारच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयात दिली आहे. अशा वेळी उपस्थित झालेल्या प्रश्नांवर समर्पक उत्तरे देण्याऐवजी शिक्षणमंत्र्यांनी अशी टिप्पणी करणे यातून एकूण परीक्षा यंत्रणेत सुधारणा करण्याचा मानस पुरेसा स्पष्ट होत नाही, हे उघड आहे.नीट’मध्ये ६७ विद्यार्थ्यांचे पैकीच्या पैकी गुण, १,५६३ विद्यार्थ्यांचे वाढीव गुण आणि वेगवेगळ्या राज्यांतून सापडलेले या परीक्षेची प्रश्नपत्रिका फोडण्यात सहभागी असलेले आरोपी यामुळे परीक्षेवर गंभीर सावट होते. सुनावणीदरम्यान वाढीव गुण रद्द करून ते मिळालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घ्यावीच लागली. ती ज्यांनी दिली नाही, त्यांचे वाढीव गुण कमी झाले आणि ज्यांनी दिली, त्यानंतर पैकीच्या पैकी गुण मिळविणाऱ्यांची संख्या ६७ वरून ६१ झाली! त्याचप्रमाणे अन्य एका प्रश्नाच्या योग्य उत्तरासाठी तज्ज्ञांची समितीही नेमावी लागली. एकीकडे ‘नीट’वर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना, या परीक्षेचे संचालन करणाऱ्या राष्ट्रीय चाचणी संस्थेनेच यूजीसी-नेट ही परीक्षा गैरप्रकार झाल्याच्या शंकेमुळे पुढे ढकलली होती. या सर्व बाबी परीक्षा यंत्रणेत असलेल्या गंभीर त्रुटी स्पष्ट करणाऱ्या आणि त्या वेळीच दुरुस्त करण्यासाठी पावले उचलण्याची गरज अधोरेखित करणाऱ्या आहेत. ‘नीट’मधील घोळापाठोपाठ पुढे आलेल्या प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या प्रकरणामुळे ‘यूपीएससी’सारख्या संस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित राहिले आहे. करणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व काही पारदर्शकपणे पार पडेल, याचा दिलासा देण्याची जबाबदारी सरकारची आहे, हे सरकारने विसरू नये. विरोधकांनीही लक्षात घेण्याचा एक मुद्दा. ‘एक देश, एक परीक्षा’ हे सूत्र संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार असतानाच पुढे आले होते आणि त्यातूनच ‘नीट’ ही वैद्याकीय पदवी अभ्यासक्रमांसाठीची एकमेव प्रवेश परीक्षा असेल.

## संपादकीय »

### अगाऊपणा

***इशित ‘केबीसी’त जिंकला असता, तर अशाच प्रतिक्रिया उमटल्या असत्या का? त्या वेळी कदाचित त्याच्या या अशा ‘दिसण्या’चे स्मार्टनेस म्हणून कौतुक झाले असते...***

एखाद्या घटनेचे इंटरनेटवर वादळ निर्माण होणे हे आजच्या डिजिटल काळात काही नवीन नाही. ती या जगात टिकून राहण्यासाठीची गरज आहे. पण वादळ असले तरी डिजिटलच ते. काही दिवसांनी वा आठवड्यांनी त्याचा परिणामही उरत नाही. याचीही या डिजिटल जगताला सवय, कारण हे विरले तरी पुढचे वादळ तयार असते किंवा मिळवले, निर्माण केले जाते.

जागतिक तापमानवाढीमुळे कमी वेळात अधिक पाऊस पडण्याच्या घटना जशा सातत्याने वर्षभर आताशा कुठे ना कुठे घडत असतात, तशीच कमी वेळात अशी जोरदार डिजिटल वादळे सातत्याने मोबाइल, दूरचित्रवाणी, संगणक अशा आधुनिक पडद्यांना धडका देत राहतात. त्यातील अलीकडचे वादळ हे गुजरातच्या गांधीनगरमधील इशित भट्ट नावाच्या मुलाच्या ‘कौन बनेगा करोडपती’ या कार्यक्रमातील वर्तनाने निर्माण झालेले.

भारतीय अर्थव्यवस्थेने २०२३-२४ मध्ये सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) वाढीचा दर ८.२ टक्के नोंदवला आणि बहुतेक अंदाजांनुसार तो चालू आर्थिक वर्षात (२०२४-२५मध्ये) सात टक्क्यांच्या वर राहण्याची शक्यता आहे, असे आपण केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात ऐकले.

# दिलाशाची आशा अर्थसंकल्पाने फोलच ठरवली

ही उत्साहवर्धक बातमी! पण कृषी क्षेत्रातील वाढ २०२२- २३ मधील ४.७ टक्क्यांवरून २०२३-२४ मध्ये १.४ टक्क्यांवर घसरलेली आहे. या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पात शेतीला मोठा दिलासा मिळेल अशी आशा होती, ती आता फोल ठरली आहे.अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ‘विकसित भारत @२०२४’ चा पाठपुरावा करण्यासाठी एक ‘रोडमॅप’ (हा त्यांचाच शब्द) प्रदान केला आहे. त्यासाठी नऊ प्रमुख प्राधान्य क्षेत्रांचा उल्लेख सीतारामन यांनी केला, त्यातही ‘शेतीमधील उत्पादकता आणि लवचिकता (हवामान-रोधकता)’ याचा उल्लेख पहिल्या स्थानावर होता! हीदेखील समाधानाचीच बाब आहे. पण हा उल्लेख प्रत्यक्षात येण्याची आशा एवढ्यातच का मंदावते आहे? शेतीला प्रोत्साहन देण्याचा सर्वात चांगला मार्ग म्हणजे कृषी संशोधनावर भर देऊन हे संशोधन शेतीच्या बांधापर्यंत पोहोचवणे. कृषी संशोधनाच्या ‘सीमान्त परताव्याचा’- मार्जिनल रिटर्न्सचा- दर एकास दहा असा असतो, हे



जाणकारांना माहीतच असेल, पण तरी फोड करून सांगतो की, समजा शेती- संशोधनासाठी एक हजार कोटी रुपये खर्च केले, तर त्या संशोधनाचा प्रत्यक्ष पिकांना फायदा झाल्यानंतर १०,००० कोटी रुपयांची वाढ कृषी क्षेत्राच्या ‘जीडीपी’मध्ये होत असते. अशा गुंतवणुकीमुळे कृषी क्षेत्राला उच्च विकासाच्या मार्गावर नेता आले असते.

परंतु अर्थसंकल्पीय खर्चाचे आकडे पाहाता, असा विचार झाल्याचे दिसत नाही. कृषी संशोधन आणि शिक्षण विभागाला (डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च ॲण्ड एज्युकेशन) यंदा ९९.४ अब्ज रुपये मिळाले आहेत, ही वाढ २०२३-२४ मधील (सुधारित अंदाजांनुसार) ९८.८ अब्ज रुपयांपेक्षा फक्त ०.७ टक्क्यांनी जास्त आहे. हे अपेक्षेपेक्षा कमी आहेच पण खरे तर वाढत्या गरजा पाहाता ही तथाकथित ‘वाढीव’ तरतूद आधीपेक्षाही कमीच पडणार आहे.आम्ही आदल्या काही अर्थसंकल्पांचा धांडोळा घेतला तेव्हा असे दिसून आले की २०२०-२१ मध्ये कृषी संशोधन आणि विकास खर्च १६० अब्ज रुपयांवर पोहोचला होता, त्यापैकी ८९ टक्के सार्वजनिक क्षेत्रातून आणि ११ टक्के खासगी क्षेत्रातून खर्च होणार होते. हे आकडे कृषी संशोधनाच्या व्याप्तीची कल्पना देत असले तरी, ‘कृषी संशोधन सघनता’ (ॲग्रिकल्चरल रीसर्च इन्टेन्सिटी – ‘एआरआय’) म्हणजेच अंदाजित कृषी-जीडीपीच्या तुलनेत संशोधनावर झालेल्या खर्चाची टक्केवारी विचारात घेणे महत्त्वाचे आहे. हा ‘एआरआय’ २००८-०९ मध्ये ०.७५ टक्क्यांवर पोहोचला होता आणि २०२२-२३ मध्ये ०.४३ टक्के होता. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये यात आणखी घसरण होईल, कारण या विभागातील वाटप प्रत्यक्षात कमी झाले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## न्यायालयाच्या आदेश

## ४७ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

# साईबाबा संस्थानमध्ये 77 लाखांचा गैरव्यवहार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिर्डी येथील साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागात ७७ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांसह ४७ कर्मचाऱ्यांवर न्यायालयाच्या आदेशाने शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## गैरव्यवहाराचा गुन्हा दाखल




कोपरगावमधील सामाजिक कार्यकर्ते भास्करराव संजय काळे यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईबाबा संस्थानकडे तक्रार करूनही दखल न घेतल्याने संजय काळे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. काल शुक्रवारी रात्री त्यांनी शिर्डी पोलिसांकडे फिर्याद दिली.त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, श्री साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागात संस्थान कर्मचारी म्हणून कार्यरत असताना त्यांच्या अखत्यारीत व जबाबदारीमध्ये असलेल्या विद्युत साहित्यांची डेडस्टॉक रजिस्टरप्रमाणे नोंदणी न ठेवता विद्युत साहित्याची चोरी केली व डेडस्टॉक रजिस्टरमध्ये बनावट नोंदी केल्या. ज्यावेळी गैरव्यवहार उघडकीस आला, त्यावेळी अतिरिक्त विद्युत साहित्य या ठिकाणी जमा केले आहे. याबाबत लेखापरीक्षण केल्यानंतर असे दिसून आले आहे की, वरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मिळून ७७ लाख १३ हजार रुपयांची वीज साहित्याची चोरी करून त्याचा अपहार केला आहे.त्यात सर्व ४७ आरोपींवर स्वतंत्रपणे चोरीच्या साहित्याच्या रकमेची जबाबदारी निश्चिती केली आहे. त्यापैकी ३९ आरोपींनी त्यांच्यावर निश्चित केलेल्या जबाबदारीची रक्कम संस्थांनमध्ये भरणा केली आहे. तर उर्वरीत ८ आरोपींनी त्यांच्यावर निश्चित केलेल्या जबाबदारीची रक्कम भरणा केली नाही. अशा प्रकारे सर्व ४७ जणांनी कट करून विद्युत साहित्य चोरी व गैरव्यवहार केलेला आहे, असे संजय काळे यांनी फिर्यादीत नमूद केले आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती व त्यात उच्च न्यायालयाने दि. १५ ऑक्टोबर रोजी त्यांना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास आदेशीत केले होते. त्यानुसार काल, शुक्रवारी रात्री शिर्डी पोलीस ठाण्यात साईबाबा संस्थानच्या ४७ कर्मचारी व अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईबाबा संस्थानचे प्रशासन ४७ जणांवर काय कारवाई करणार याकडे भाविकांचे लक्ष लागले आहे. या प्रकाराने शिर्डीसह साई संस्थान

## विद्युत साहित्य चोरी

त्यात सर्व ४७ आरोपींवर स्वतंत्रपणे चोरीच्या साहित्याच्या रकमेची जबाबदारी निश्चिती केली आहे. त्यापैकी ३९ आरोपींनी त्यांच्यावर निश्चित केलेल्या जबाबदारीची रक्कम संस्थांनमध्ये भरणा केली आहे. तर उर्वरीत ८ आरोपींनी त्यांच्यावर निश्चित केलेल्या जबाबदारीची रक्कम भरणा केली नाही. अशा प्रकारे सर्व ४७ जणांनी कट करून विद्युत साहित्य चोरी व गैरव्यवहार केलेला आहे, असे संजय काळे यांनी फिर्यादीत नमूद केले आहे.

वर्तुळात खळबळ उडाली आहे.

संजय काळे यांच्या पाठपुराव्यातून हा घोटाळा उजेडात आला. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शिर्डी पोलिसांनी याप्रकरणी फिर्याद दाखल करून घेतली आहे. पोलीस तपासात आणखी कोणती माहिती समोर येते, याकडे साईभक्तांचे लक्ष राहील. कोपरगावमधील सामाजिक कार्यकर्ते भास्करराव संजय काळे यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईबाबा संस्थानकडे तक्रार करूनही दखल न घेतल्याने संजय काळे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. काल शुक्रवारी रात्री त्यांनी शिर्डी पोलिसांकडे फिर्याद दिली.त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, श्री साईबाबा संस्थानच्या विद्युत विभागात संस्थान कर्मचारी म्हणून कार्यरत असताना त्यांच्या अखत्यारीत व जबाबदारीमध्ये असलेल्या विद्युत साहित्यांची डेडस्टॉक रजिस्टरप्रमाणे नोंदणी न ठेवता विद्युत साहित्याची चोरी केली व डेडस्टॉक रजिस्टरमध्ये बनावट नोंदी केल्या. ज्यावेळी गैरव्यवहार उघडकीस आला, त्यावेळी अतिरिक्त विद्युत साहित्य या ठिकाणी जमा केले आहे. याबाबत लेखापरीक्षण केल्यानंतर असे दिसून आले आहे की, वरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मिळून ७७ लाख १३ हजार रुपयांची वीज साहित्याची चोरी करून त्याचा अपहार केला आहे.

## उच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर गुन्हा दाखल!

# गंभीर आरोपांवरून नगर शहरातील सहा डॉक्टरांवर गुन्हा दाखल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**करोना संसर्ग झालेला नसतानाही तो झाल्याचा बनाव करत वयोवृद्ध रुग्णास करोनाबाधित रुग्णांसोबत मर्जीविरूद्ध दाखल केले. त्यांच्यावर अति तीव्र स्वरुपाचे, जीवितास धोका निर्माण होईल असे औषधोपचार करून मृत्यूस कारणीभूत झाल्याचा तसेच औषधोपचाराची अवाजवी देयके आकारून फसवणूक केली,**

अवयवांची तस्करी केली व पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावल्याच्या आरोपावरून शहरातील विविध रुग्णालयांच्या ६ डॉक्टरांविरूद्ध तोफखाना पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झालेल्या सहाही डॉक्टरांचा शोध घेतला जात असल्याची माहिती तपासी अधिकारी तथा तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांनी दिली. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तपासात आरोपींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. सहा जणांमध्ये दोघे खासगी रुग्णालय चालवणारे, दोघे कोविड सेंटर चालवणारे, एक जण पॅथॉलॉजिस्ट तर आणखी एक जण एका प्रतिष्ठानच्या रुग्णालयातील



प्रयोगशाळा तंत्रज्ञ आहे. याशिवाय इतर कर्मचाऱ्यांविरूद्धही कट करत तालुका फसवणूक व मृत्यूस कारणीभूत झाल्याचा आरोप आहे.यासंदर्भात अशोक बबनराव खोकराळे (वय ४७, रा. सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनीच उच्च न्यायालयात या घटनेसंदर्भात दाद मागितली होती. त्यांचे ७९ वर्षीय वडील बबनराव नारायणराव खोकराळे यांचा या घटनेत मृत्यू झाला. ऑगस्ट २०२० दरम्यानची घटना आहे.संशयित आरोपी डॉक्टरांनी

## वडीलांच्या मृत्यूची बातमी

अशोक खोकराळे यांनी भेटण्याचा प्रयत्न केला असता त्यांना अडवण्यात आले व डॉक्टरांनी ‘रुग्ण नॉर्मल आहे’ असे सांगितले. मात्र नंतर ते करोनाबाधित असल्याचे सांगून डिस्चार्ज देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर १८ ऑगस्ट २०२० रोजी अशोक खोकराळे यांना वडीलांच्या मृत्यूची बातमी मिळाली.

सावेडी उपनगरातील मनमाड रस्त्यावरील पटियाला हाऊस येथे तात्पुरते करोना उपचार केंद्र सुरू केले होते. वडिलांना घशाची खवखव व बद्धकोष्ठतेचा त्रास होत होता. त्याच्या उपचारासाठी संबंधित डॉक्टरांनी त्यांना पटियाला हाऊस येथील कोविड सेंटरमध्ये दाखल केले.

करोना निदान तपासणी अहवाल साधारण असूनही त्यांना निरीक्षणाखाली ठेवले तसेच फिर्यादी यांना न कळवताच परस्पर खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. खासगी रुग्णालयातून वडिलांनी मुलांना फोन करून ‘डॉक्टर मला बेडला बांधून ठेवतात, खूप रक्त काढळे, मला इथून घेऊन जा,’ अशी विनवणी केली होती.

छुप्या तळांवर हवाई हल्ले

तीन क्रिकेटपटूंसह अनेकांचा मृत्यू; दोहा चर्चेवर सावट

# पाकिस्तानचे अफगानवर हल्ले!

## तीन क्रिकेटपटूंसह अनेक व्यक्तींचा मृत्यू



। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पाकिस्तानने शुक्रवारी रात्री उशिरा अफगाणिस्तानातील दहशतवाद्यांच्या छुप्या तळांवर हवाई हल्ले केले. त्यामध्ये तीन क्रिकेटपटूंसह अनेक व्यक्तींचा मृत्यू झाला. यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला असून, कतारमध्ये होणाऱ्या अपेक्षित चर्चेवर अनिश्चिततेचे सावट पडले आहे.**

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानदरम्यानचा ४८ तासांचा शस्त्रविराम शुक्रवारी संपल्यानंतर दोन्ही बाजूंकडून त्याला मुदतवाढ देण्यात आली. ही मुदतवाढ कतारची राजधानी दोहा येथे होणाऱ्या चर्चेपर्यंत निर्धारित करण्यात आली होती. त्यापूर्वी पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा राज्यामधील अफगाणिस्तानला लागून असलेल्या उत्तर वझिरिस्तान जिल्ह्यात दहशतवाद्यांनी पाकिस्तानी सैन्याच्या छावणीवर केलेल्या हल्ल्यात सात पाकिस्तानी सैनिक ठार झाले होते.पाकिस्तानच्या 'द डॉन' या वर्तमानपत्राने दिलेल्या वृत्तानुसार, पाकिस्तानी सैन्याने शुक्रवारी रात्री उशिरा अफगाणिस्तानच्या अंगूर अड्डा भागाला लक्ष्य केले. तसेच पाकटिका प्रांतातील उर्गुन आणि बारमाल जिल्ह्यांतील दहशतवाद्यांच्या छुप्या तळांवर हल्ले केले. यामध्ये हाफिज गुल बहादूर गटाच्या तळावर अचूक हल्ले केल्याचा दावा पाकिस्तानच्या सुरक्षा दलांनी केला. त्यामध्ये १० पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला.पाकिस्तानचे लष्करप्रमुख, फिल्ड मार्शल असीम मुनीर यांनी पुन्हा एकदा भारताविरोधात गरळ ओकली आहे. पाकिस्तान स्वतः अफगाणिस्तानच्या निष्पाप सामान्य नागरिकांवर बॉम्बवर्षाव करत असताना असीम मुनीर यांनी अण्वस्त्रांचा उल्लेख करत भारताविरोधात विधान केले आहे. पाकिस्तानची लष्करी ताकद वाढत असून आम्ही भारताच्या युद्धक्षेत्राचा भूगोल बदलून टाकू, अशी पोकळ डरकाळी मुनीर यांनी फोडली आहे. पाकिस्तानच्या काकुल येथील पाकिस्तानी मिलिटरी अकादमी येथे भाषण करत असताना असीम मुनीर यांनी भारताविरोधात चिथावणीची भाषा वापरली.

पाकिस्तानच्या डॉन या वृत्तपत्राने दिलेल्या बातमीनुसार, मुनीर यांच्या आतापर्यंतच्या सर्वात प्रक्षोभक भाषणांपैकी हे एक भाषण होते.मे महिन्यात भारताविरोधात उडालेल्या संघर्षात पाकिस्तानने स्पष्ट विजय मिळविला आहे आणि यापुढे भारताकडून कोणत्याही चिथावणीला पाकिस्तानी लष्कर निर्णायक प्रतिसाद देईल, असे विधान असीम मुनीर यांनी यावेळी केले.असीम मुनीर म्हणाले, "मी भारताच्या लष्करी नेतृत्वाला सल्ला आणि इशारा देतो की, दोन अण्वस्त्रधारी देशांनी युद्धाला अजिबात थारा देऊ नये. जर शत्रुत्वाची नवी लाट सुरू झाली तर पाकिस्तान समोरच्या देशापेक्षा खूप जास्त प्रतिकार करेल. लढाई आणि दळणवळण क्षेत्रातील फरक कमी होत असल्यामुळे आमच्या शस्त्रांची पोहोच आणि प्राणघातकता भारताच्या भुगोलाच्या कल्पित प्रतिकारशक्तीला धक्का देऊ शकते."पुढे म्हणाले, जगात अशांतता असताना पाकिस्तानने प्रादेशिक स्थिरता प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी पाकिस्तानचे चीन, अमेरिका, सौदी अरेबिया आणि इराणशी जवळचे संबंध असल्याचे नमूद केले. चीनशी त्यांची ऐतिहासिक अशी अभूतपूर्व भागीदारी निर्माण झाली आहे.

तसेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कौतुक करताना त्यांनी ट्रम्प यांना शांतता प्रस्थापित करणारे धोरणात्मक नेते म्हटले.स्थिरता आणणारा देश म्हणत आहेत. पण दुसऱ्या बाजूला त्यांच्याकडून अफगाणिस्तानवर बॉम्बवर्षाव सुरू आहे. पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यात शनिवारी अफगाणिस्तानच्या तीन क्रिकेटपटूंचा मृत्यू झाला.

### हल्ल्यात सात पाकिस्तानी ठार

शस्त्रविराम शुक्रवारी संपल्यानंतर दोन्ही बाजूंकडून त्याला मुदतवाढ देण्यात आली. ही मुदतवाढ कतारची राजधानी दोहा येथे होणाऱ्या चर्चेपर्यंत निर्धारित करण्यात आली होती. त्यापूर्वी पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा राज्यामधील अफगाणिस्तानला लागून असलेल्या उत्तर वझिरिस्तान जिल्ह्यात दहशतवाद्यांनी पाकिस्तानी सैन्याच्या छावणीवर केलेल्या हल्ल्यात सात पाकिस्तानी सैनिक ठार झाले होते.

## भारत-अमेरिकेतील टॅरिफ तणाव कधी संपेल?

## भारताचे केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी मोठं विधान केलं



। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**गेल्या काही महिन्यांपासून भारत आणि अमेरिकेत व्यापार तणाव निर्माण झालेला आहे. या तणावाचं कारण म्हणजे अमेरिकेने भारतातून निर्यात होणाऱ्या मालावर तब्बल ५० टक्के टॅरिफ लादलेलं आहे. एवढंच नाही तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने भारतावर टीका करत आहेत. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफसमोर भारत कधीही झुकणार नाही अशी भूमिका भारताने घेतलेली आहे.**

या सर्व घडामोडीनंतर अद्यापही भारत-अमेरिकेत व्यापार तणाव कायम आहे. मात्र, हा तणाव कधी कमी होईल? यावर आता भारताचे केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी मोठं विधान केलं आहे. मंत्री पीयूष गोयल यांनी शनिवारी सांगितलं की, 'भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार करारावरील चर्चा सौहार्दपूर्ण वातावरणात सुरू आहे आणि या चर्चेत प्रगती होत आहे', असं पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. दरम्यान, भारत-अमेरिकेतील व्यापार करार कधी होईल? याची थेट तारीख सांगण्यास पीयूष गोयल यांनी नकार दिला. तसेच भारत-अमेरिकेतील टॅरिफबाबत भारताला गूड न्यूज कधी मिळेल? असा प्रश्न पीयूष गोयल यांना विचारण्यात आला. यावर पीयूष गोयल यांनी म्हटलं की, "दोन्ही देशांमधील व्यापार चर्चा सुरू आहेत." या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या अतिरिक्त शुल्काबाबत विचारलं असता पीयूष गोयल यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं की, "जेव्हा यासंबंधीच्या निर्णयाबाबत एकमत होईल, तेव्हा माध्यमांना त्याबाबत माहिती दिली जाईल."मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं की, "दोन्ही देशांत वाटाघाटी अतिशय सकारात्मक वातावरणात सुरू आहे आणि चर्चेत प्रगती होत आहे. मी यापूर्वीही अनेक वेळा सांगितलं आहे की मुक्त व्यापार करार किंवा व्यापार वाटाघाटी कधीही अंतिम मुदतीसह पूर्ण होत नाहीत. अमेरिकेशी कोणताही करार राष्ट्रीय हिताचा आहे, याची पुष्टी झाल्याशिवाय केला जाणार नाही. देशातील शेतकरी, मच्छीमार आणि एमएसएमई क्षेत्राचं हित लक्षात घेतलं जाईल."या सर्व घडामोडीनंतर अद्यापही भारत-अमेरिकेत व्यापार तणाव कायम आहे. मात्र, हा तणाव कधी कमी होईल?

### व्यापार करारावरील चर्चा

यावर आता भारताचे केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी मोठं विधान केलं आहे. मंत्री पीयूष गोयल यांनी शनिवारी सांगितलं की, 'भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार करारावरील चर्चा सौहार्दपूर्ण वातावरणात सुरू आहे आणि या चर्चेत प्रगती होत आहे', असं पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे.

# 'लाखात एक आमचा दादा' फेम अभिनेत्री रमली शेतकामात

मराठी कलाकार हे त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकतातच, पण अनेकदा या कलाकारांचा साधेपणाही चाहत्यांना भावतो. मराठी कलाकार हे ग्लॅमरस इंडस्ट्रीत काम करत असले; तरी अनेकदा ही कलाकार मंडळी आयुष्यात अगदी साधेपणाने जगत असतात. मालिका, चित्रपटात स्टार असणारे हे कलाकार वैयक्तिक आयुष्यात अगदी साधेपणाने आयुष्य जगत असतात. अशाच साधेपणा जपणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे राजश्री निकम. राजश्री निकम या सोशल मीडियावर कायमच सक्रिय असतात. सोशल मीडियाद्वारे ते त्यांचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत असतात. त्याचबरोबर कामानिमित्तची माहितीही शेअर करत असतात. अशातच त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेला एक व्हिडीओ सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.राजश्री यांनी शेअर केलेला हा व्हिडीओ शेतीकामाचा आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या या व्हिडीओ त्या कापणी



करतानाचे दिसत आहे. हा व्हिडीओ शेअर करत त्यांनी शेती आणि एन्जॉय असंही म्हटलं आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये त्या आनंदाने शेतीकाम करत असतानाचे पाहायला मिळत आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेला व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.अनेकांनी या व्हिडीओला लाईक्स आणि कमेंट्सद्वारे चांगलाच प्रतिसाद दिला आहे. त्याचबरोबर अनेकांनी अभिनेत्रीच्या साधेपणाचंही कौतुक केलं आहे. अभिनेत्री अश्विनी महांगडेनेही राजश्री यांच्या या व्हिडीओवर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अश्विनीने 'ताई' अशी कमेंट करत अभिनेत्रीच्या कृतीचं कौतूक केलं आहे. त्याचबरोबर अभिनेत्री सारिका नवाथे यांनीसुद्धा हा व्हिडीओ आवडला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.दरम्यान, राजश्री निकम या सध्या झी मराठी वाहिनीवरील 'लाखात एक आमचा दादा' या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

## दीपिका कक्करला ट्यूमर

टीव्ही अभिनेत्री दीपिका कक्कर दुसऱ्या टप्प्यातील यकृताच्या कर्करोगाने ग्रस्त आहे. एका महिन्यापूर्वी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती ज्यामध्ये तिच्या यकृतातून टेनिस बॉलच्या आकाराचा ट्यूमर काढण्यात आला होता. अलीकडेच दीपिका पुन्हा पती शोएब इब्राहिमसह रुग्णालयात गेली होती. आता एका नवीन व्लॉगमध्ये शोएब इब्राहिमने खुलासा केला आहे की ट्यूमर शस्त्रक्रियेदरम्यान दीपिकाच्या यकृताचा काही भाग देखील कापावा लागला.नवीन व्लॉगमध्ये, दीपिका कक्कर आणि शोएब इब्राहिम त्यांचा मुलगा रुहान आणि पुतण्या हैदरसाठी खरेदी करताना दिसत आहेत. खरेदी केल्यानंतर घरी परतताना, दीपिका खूप थकलेली दिसते, ज्यावर शोएब म्हणतो "कधीकधी थकवा येतो आणि काहीही असो, शस्त्रक्रियेला फक्त एक महिना झाला आहे. यकृताचा एक भाग काढावा लागला."शोएब इब्राहिम हाताने आकार दाखवत पुढे म्हणतो "तिच्या यकृताचा इतका भाग गेला आहे, इतका मोठा ट्यूमर आणि इतका भाग गेला आहे."आज माझे टाके देखील काढले गेले आहेत." मग शोएब म्हणतो "डॉक्टर म्हणत होते की कधीकधी असा दिवस येतो जेव्हा तुम्हाला काहीही करावेसे वाटत नाही.

## सोनालीचा मराठमोळा अंदाज!



मराठी कलाविश्वाची 'अप्सरा' म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. 'नटरंग', 'हिरकणी', 'मितवा', 'पोश्टर गर्ल' अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. आपल्या वैयक्तिक जीवनातील प्रत्येक अपडेट सोनाली इन्स्टाग्रामवर शेअर करत असते. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. नुकताच अभिनेत्रीने शेअर केलेला डान्स व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे. अलीकडच्या काळात सोशल मीडियावर नवनवीन गाणी व्हायरल होत असतात. सध्या इन्स्टाग्रामवर एका व्हायरल कवितेने सर्वांचं मन जिंकून घेतलं आहे. ही कविता वैभव जोशी आणि अमर ओक यांच्या ऋतू बरवा कार्यक्रमामुळे चर्चेत आली आहे. या कवितेच्या ओळी आहेत...या व्हायरल कवितेने सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. सोनाली कुलकर्णीला देखील या गाण्याची भुरळ पडली आहे. सध्या सोनाली कामानिमित्त इंग्लंड दौऱ्यावर आहे. याठिकाणी मराठमोळा लूक करून सोनालीने व्हायरल गाण्यावर ठेका धरल्याचं पाहायला मिळत आहे.सोनाली लिहिते, "व्हायरल कवितेवर REEL व्हिडीओ बनवला नाही तर पाप लागेल...आणि ती संधी इंग्लंडमध्ये युरोपियन मराठी संमेलनच्या निमित्ताने मिळाली. अशी संधी मिळत असेल तर का बरं सोडावी?"सोनालीच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांसह मराठी कलाकारांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. "खूप छान सोनाली मॅडम", "पैठणीच्या कोणत्याही ड्रेसमध्ये ताई तू सुंदरच दिसतेस... आणि आज मराठमोळा लूक करून डान्स... कमाल", "ट्रेंड सेटर सोनाली मॅम" अशा प्रतिक्रिया अभिनेत्रीने या व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर येत्या काळात ती 'मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी' या सिनेमात प्रमुख भूमिका साकारताना दिसेल. हा सिनेमा कथालेखक आणि इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई या पुस्तकावर आधारित आहे.मराठी कलाविश्वाची 'अप्सरा' म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. 'नटरंग', 'हिरकणी', 'मितवा', 'पोश्टर गर्ल' अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री

## स्क्विड गेम 3' च्या शेवटावर प्रेक्षकांची नाराजी

दक्षिण कोरियाची वेबसीरीज 'स्क्विड गेम' पहिल्या भागापासून ओटीटी विश्वात धुमाकूळ घालत आहे. २७ जून रोजी या मालिकेचा तिसरा आणि अखेरचा सीझन प्रदर्शित झाला. प्रदर्शन झाल्यानंतर या मालिकेने अनेक विक्रम मोडीत काढले आहेत. लाखो चाहत्यांनी बिंज वॉच केल्यामुळे नेटफ्लिक्सचे ॲप काही वेळासाठी क्रॅश झाल्याची बातमीही समोर आली होती. मात्र या सीझनचा शेवट अनेक चाहत्यांना आवडलेला नाही. त्यावरून आता टीका सुरू झाली आहे. दक्षिण कोरियातही याचे पडसाद उमटले असून थेट शेअर बाजारात स्क्विड गेमशी निगडित कंपन्यांच्या समभागात घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. अखेर या सीरीजचे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते ह्वांग डोंग-ह्युक यांनी नेटफ्लिक्स आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांना मुलाखत देऊन शेवट असा का केला? याची माहिती दिली.स्क्विड गेम वेबसीरीजमधील सर्वच पात्र हे या सीरीजचे सर्वात मोठे शक्तीस्थळ आहे. त्यांचे वैयक्तिक आयुष्य, त्याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम, संकट समोर असताना त्यांच्यातील समोर आलेले खरे रुप, माणुसकी, लोभ, लालसा आणि हिंस्रपणा या भावना मालिकेत पदोपदी ठासून भरलेल्या आहेत. त्याबरोबर मालिकेत खेळले जाणारे खेळ त्यात अजून रंगत भरतात. पहिल्या सीझनपासून मध्यवर्ती भूमिका असलेले प्लेअर नंबर. ४५६ अर्थात गि-हून हे पात्र प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे.अभिनेते ली जंग-जे यांनी स्क्विड गेममध्ये गि-हून हे पात्र साकारले आहे. त्यांच्या पात्राशी जगभरातील चाहते जोडले गेले असताना शेवटच्या सीझनमधील अखेरच्या भागात त्यांचा शेवट दाखविण्यात आल्यामुळे चाहते चांगलेच संतापले आहेत. पहिल्या सीझनप्रमाणे हॅप्पी एंडिंगचा कयास बांधलेल्या चाहत्यांना हा मोठा धक्काच होता. यातून दिग्दर्शक आणि निर्मात्यांवर टीका होऊ लागली. अखेर नेटफ्लिक्सला दिलेल्या मुलाखतीत दिग्दर्शकांनी यावर उत्तर दिले.लेखक, दिग्दर्शक ह्वांग डोंग-ह्युक, अभिनेते ली जंग-जे आणि फ्रंट मॅनचे पात्र रंगविणाऱ्या ह्वांग इन-हो यांनी नेटफ्लिक्सवर तिसऱ्या सीझनबाबत संवाद साधला.



## मानसी १० वर्षे टेलिव्हिजनपासून का दूर होती?

बॉलीवूडची क्वीन कंगना रणौत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा 'इमर्जेन्सी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. कंगना नेहमीच राजकीय विषयांवर आपले मत मांडत असते. दरम्यान नुकत्याच एका मुलाखतीत तिने राजकीय प्रवेशाबाबत वक्तव्य केले आहे.कंगनाने याआगोदर अनेकदा राजकारणात येण्याबाबत आपले मत व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये कंगनाने राजकीय प्रवेशाबाबत मत व्यक्त केले होते. ती म्हणाली होती "जर भगवान कृष्णाची इच्छा असेल तर मी लोकसभा निवडणुकाही लढवेन."आता नुकत्याच एका मुलाखतीत कंगनाने पुन्हा एकदा राजकीय प्रवेशाबाबत मोठे वक्तव्य केले आहे.सध्या कंगना 'इमर्जेन्सी' चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान एका मुलाखतीत तिला तुला देशाची पंतप्रधान बनण्याची इच्छा आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देत कंगना म्हणाली, 'मी 'इमर्जेन्सी' नावाचा एकच चित्रपट केला आहे. तो चित्रपट पाहिल्यानंतर मी पंतप्रधान व्हावे असे कोणालाच वाटणार नाही. 'इमर्जेन्सी' हा आपल्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा आणि काळा अध्याय आहे.

## ७४ धावांनी पराभव

## रिषाद हुसेनने पटकावल्या ६ विकेट्स

# बांगलादेशकडूनही चीतपट!

## पराभवाची मालिका बांगलादेशातही सुरू



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत दौऱ्यात दोन्ही कसोटीत पराभवाचा सामना करावा लागलेल्या वेस्ट इंडिजला बांगलादेश दौऱ्यातील पहिल्या वनडे सामन्यातही पराभवाचा दणका बसला. विजयासाठी २०८ धावांचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजची स्थिती ७९/१ अशी होती. मात्र त्यानंतर रिषाद हुसेनच्या फिरकीसमोर वेस्ट इंडिजने लोटांगण पत्करलं आणि त्यांचा डाव १३३ धावांतच आटोपला.**

बांगलादेशने ७४ धावांच्या फरकाने मोठा विजय मिळवला. या विजयासह बांगलादेशने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

वेस्ट इंडिजने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला होता. फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्टीवर बांगलादेशच्या बॅट्समनलाही धावांसाठी संघर्ष करावा लागला. तौहिद हृदॉयने ५१ धावांची संयमी खेळी केली. महिदुल इस्लाम अकोनने ४६ तर नझमुल हसन शंटोने ३२ धावा करत तौहिदला चांगली साथ दिली. रिषादने १३ चेंडूत १ चौकार आणि २ षटकारांसह २६ धावांची खेळी केली. बांगलादेशचा डाव २०७ धावांत आटोपला. वेस्ट इंडिजतर्फे जयडेन सील्सने ३ तर रॉस्टन चेस आणि जस्टीन ग्रीव्ह्सने प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.प्रत्युतरादाखल खेळताना ब्रँडन किंग आणि अलिक अथेन्झ यांनी ५१ धावांची खणखणीत सलामी दिली. रिषादने अथेन्झला बाद करत ही जोडी फोडली. त्याने २७ धावा केल्या. केसी कार्टीने किंगला साथ दिली. वेस्ट इंडिजचा संघ ७९/१ असा सुस्थितीत होता. रिषादने कार्टीला बाद केलं. खेळपट्टीवर स्थिरावलेल्या कार्टीला रिषादनेच तंबूचा रस्ता दाखवला. त्याने ६० चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारासह ४४ धावांची खेळी केली. धडाकेबाज फलंदाजीसाठी प्रसिद्ध शेरफन रुदरफोर्डलाही रिषादने त्याच षटकात बाद केलं. पुढच्या षटकात रिषादने भरवशाच्या रॉस्टन चेसला माघारी धाडलं. चेसने ६ धावा केल्या. गुदकेश मोटीने प्रतिकार केला पण मेहदी हसन मिराझने गुदकेशला एलबीडब्ल्यू बाद केलं. तन्वीर इस्लामने शे होपला बाद करत वेस्ट इंडिजच्या आशा संपुष्टात आणल्या. होपला ३२ चेंडूत १५ धावाच करता आल्या. तडाखेबंद फटकेबाजीसाठी प्रसिद्ध रोमारिओ शेफर्ड केवळ एक धाव करून तंबूत परतला. मुस्ताफिझूरने त्याला बाद केलं. मुस्ताफिझूरनेच जस्टीन ग्रीव्ह्जलाही माघारी पाठवलं. रिषादने जयडेनला बाद करत बांगलादेशच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. रिषादने ९ षटकात ३५ धावांच्या मोबदल्यात ६ विकेट्स घेत वेस्ट इंडिजच्या डावाला खिंडार पाडलं.२६ धावांची उपयुक्त खेळी आणि ६ विकेट्स पटकावणाऱ्या रिषादलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. बांगलादेशसाठी वनडेत एका डावात ६ विकेट्स पटकावणारा रिषाद केवळ चौथा खेळाडू आहे. याआधी मश्रफी मुर्तझा, रुबेन हुसेन, मुस्ताफिझूर रहमान यांनी डावात ६ विकेट्स पटकावण्याची किमया केली होती.बांगलादेशने ७४ धावांच्या फरकाने मोठा विजय मिळवला. या विजयासह बांगलादेशने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. तौहिद हृदॉयने ५१ धावांची संयमी खेळी केली. महिदुल इस्लाम अकोनने ४६ तर नझमुल हसन शंटोने ३२ धावा करत तौहिदला चांगली साथ दिली. रिषादने १३ चेंडूत १ चौकार आणि २ षटकारांसह २६ धावांची खेळी केली. बांगलादेशचा डाव २०७ धावांत आटोपला. वेस्ट इंडिजतर्फे जयडेन सील्सने ३ तर रॉस्टन चेस आणि जस्टीन ग्रीव्ह्सने प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.प्रत्युतरादाखल खेळताना ब्रँडन किंग आणि अलिक अथेन्झ यांनी ५१ धावांची खणखणीत सलामी दिली. रिषादने अथेन्झला बाद करत ही जोडी फोडली. त्याने २७ धावा केल्या.

### मालिकेत १-० आघाडी

केसी कार्टीने किंगला साथ दिली. वेस्ट इंडिजचा संघ ७९/१ असा सुस्थितीत होता. रिषादने कार्टीला बाद केलं. खेळपट्टीवर स्थिरावलेल्या कार्टीला रिषादनेच तंबूचा रस्ता दाखवला. त्याने ६० चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारासह ४४ धावांची खेळी केली. धडाकेबाज फलंदाजीसाठी प्रसिद्ध शेरफन रुदरफोर्डलाही रिषादने त्याच षटकात बाद केलं. पुढच्या षटकात रिषादने भरवशाच्या रॉस्टन चेसला माघारी धाडलं. चेसने ६ धावा केल्या.

# माणसाच्या जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा

## अफगाणिस्तानच्या संघासाठी पर्याय शोधण्यास सुरुवात




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात सशस्त्र संघर्ष सुरू आहे. शुक्रवारी पाकिस्तानच्या सैन्याने पक्तिका प्रांतात केलेल्या हवाई हल्ल्यात अफगाणिस्तानच्या तीन स्थानिक क्रिकेटपटूंचा मृत्यू झाला. यानंतर अफगाणिस्तान क्रिकेट मंडळाने पाकिस्तान, श्रीलंकेसह पुढील महिन्यात होणाऱ्या तिरंगी टी-२० मालिकेतून माघार घेण्याचा निर्णय जाहीर केला.**

अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाच्या या निर्णयावर आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची (पीसीबी) प्रतिक्रिया समोर आली आहे. पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी यावर मोठे विधान केले.५ ते २९ नोव्हेंबर दरम्यान लाहोर आणि रावळपिंडी येथे होणाऱ्या तिरंगी मालिकेत अफगाणिस्तान संघ सहभागी होणार होता. ज्यामध्ये पाकिस्तानसह श्रीलंकेचा संघही सहभागी होणार होता. मात्र पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन करत केलेल्या हवाई हल्ल्यामुळे अफगाणिस्तानमध्ये नाराजी पसरली आहे. अफगाणिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार रशीद खानने या हल्ल्याचा रानटी असा उल्लेख केला आहे. अफगाणिस्तानच्या संघाने माघार घेतली असली तरी नोव्हेंबरमध्ये होणारी तिरंगी मालिका नियोजित वेळेनुसार होईल, असे पीसीबीने म्हटले आहे. पीसीबीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हवाल्याने पीटीआय वृत्तसंस्थेने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. पीसीबीने म्हटले की, अफगाणिस्तानच्या संघाची जागा घेण्यासाठी इतर पर्यायांचा विचार केला जात आहे. यात नेपाळ आणि युएईसह इतर सहयोगी सदस्य संघाचा विचार सुरू आहे.

### इतर संघाचा विचार करत आहोत

पण कसोटी खेळणाऱ्या संघाला मालिकेत घेण्यास प्राथमिकता दिली जाईल.दरम्यान तिरंगी मालिकेत श्रीलंका सहभागी होणार आहे. पीसीबीच्या अधिकाऱ्याने म्हटले की, अफगाणिस्तानने माघार घेतली असली तरी तिरंगी मालिका वेळापत्रकानुसारच होईल. आम्ही इतर संघाचा विचार करत आहोत. अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याची घोषणा केली जाईल.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।

। दि. 19 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### साद सोशल फाउंडेशन- इरफानभाई सय्यद सोशल फाउंडेशनचा उपक्रम

# अंध बांधवांसोबत माणुसकीची दिवाळी साजरी!

## सलग 11 वे वर्ष ; अंध बांधव आणि भगिनींना "दिवाळी फराळ किट" वाटप

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या अनेक वर्षांपासून अंग बांधव भगिनींनो सोबत दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम यंदा देखील साद सोशल फाउंडेशन आणि इरफानभाई सय्यद सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून 400 अंध बंधू-भगिनींच्या चेहऱ्यावर हसू फुलले. .**




शिवसेना उपनेते तथा महाराष्ट्र मजदूर संघटनेचे अध्यक्ष इरफान सय्यद, साद सोशल फाउंडेशनचे सदस्य आणि इरफानभाई सय्यद सोशल फाउंडेशनच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी करण्यात आला. या सोहळ्याला पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी महापौर राहुल जाधव, माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, शिवसेना उपनेते सुलभा ~~उबाळे, माजी नगरसेवक उत्तम~~ केंदळे, बाप्पू घोलप, शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख भगवान पोखरकर, निलेश मुटके, संभाजी शिरसाट, निखिल बोऱ्हाडे, निलेश नेवाळे, संतोष जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजसेवक, स्थानिक नागरिक आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"दिवाळी आनंद सोहळा" या उपक्रमाचे हे अकरावे वर्ष असून, यंदाही तो मोठ्या आत्मीयतेने आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला.कार्यक्रम काळभोर लॉन्स, शालिमार बँक्वेट, दुर्गानगर चौक, निगडी, पुणे येथे कार्यक्रम पार पडला. यामध्ये सुमारे चारशे अंध बांधव आणि भगिनींना दिवाळीच्या आनंदाची अनुभूती देण्यात आली. त्यांना "दिवाळी फराळ किट" वाटप करून दिवाळीचा सण साजरा करण्यात आला.

> दिवाळी फक्त सजावट आणि फटाक्यांचा सण नाही. प्रत्येकाच्या जीवनात आनंद, सर्व समभाव आणि मदतीची वाट दाखवणारा सण आहे. साद फाउंडेशनच्या माध्यमातून अंध बांधवांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न दरवर्षी केला जातो. अंध बांधवांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानाचे हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश आहे. या सेवेत सातत्य ठेवत भविष्यातही असे उपक्रम राबवण्याचा निर्धार आहे.
>
> **-इरफान य्यद,**
> शिवसेना उपनेते तथा अध्यक्ष महाराष्ट्र मजदूर संघटना

# स्वरा कोथिंबीरेची राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड

## शिक्षण विश्व:राज्यस्तरीय स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवून केले उत्तम प्रदर्शन

### विभागीय आयुक्तांच्या प्रस्तावाला महसूल नोंदणी विभागाची मान्यता

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या लोहगाव येथील श्री संत तुकाराम माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी स्वरा संतोष कोथिंबीरे हिने छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.**



या यशामुळे स्वराची पंजाबमधील लुधियाना येथे होणाऱ्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्वराच्या या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक, क्रीडाशिक्षक तसेच तायक्वांदो प्रशिक्षक यांचे मोलाचे योगदान आहे. बारामती तायक्वांदो ॲकॅडमी व बारामती कला क्रीडा फाउंडेशनच्या वतीनेही तिला वेळोवेळी प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळाले. प्रशिक्षक मास्टर दीपक मोरे, विशाल शेडगे व विशाल माने यांनी स्वराला अत्यंत शिस्तबद्ध व प्रभावी प्रशिक्षण दिले.

### अभिनंदनचा वर्षाव!

स्वराने महानगरपालिका, विभागीय व राज्यस्तरावरील स्पर्धांमध्ये उज्वल कामगिरी केली आहे. तिच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्हा पालकमंत्री अजित पवार, मानद सचिव संदीप कदम, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग यांनी स्वराचे अभिनंदन केले असून, राष्ट्रीय स्तरावर यश मिळविण्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

## महाराष्ट्र स्टेट शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये

# यशराज जवळकरचे नेत्रदीपक यश!

## क्रीडा विश्व: अचूक नेमबाजी साधत पाच पदकांची कमाई

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**४० व्या महाराष्ट्र स्टेट शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये पुण्याच्या यशराज रघुनाथ जवळकर याने आपल्या अचूक नेमबाजीने एकूण पाच पदकांची कमाई केली आहे. राज्यभरातील कुशल नेमबाजांमध्ये यशराजने आपल्या अष्टपैलू खेळीने विशेष स्थान मिळवत महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे.**




या स्पर्धेत यशराजने तीन सुवर्ण आणि दोन कांस्य पदके मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. विविध गटांमध्ये त्याने दाखवलेली कौशल्यपूर्ण कामगिरी प्रशिक्षक व शास्त्रज्ञांचेही लक्ष वेधून घेणारी ठरली आहे. या पाच पदकांच्या झळाळत्या कामगिरीमुळे यशराजने केवळ स्वतःचेच नव्हे, तर पुणे जिल्ह्याचे आणि महाराष्ट्राचेही नाव उजळवले आहे. स्पर्धेतील त्याची सातत्यपूर्ण अचूकता व तांत्रिक निपुणता पाहून प्रशिक्षक आणि शास्त्रज्ञ यांनी त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

यशराजच्या या यशामागे त्याची दररोजची कठोर सरावशैली, शिस्त आणि मानसिक स्थैर्य हे घटक निर्णायक ठरले. नेमबाजी या खेळात ज्या प्रकारे संयम, एकाग्रता आणि सूक्ष्म निरीक्षण आवश्यक असते, ते यशराजने लहान वयातच आत्मसात केले आहे. त्याच्या प्रशिक्षकांनी सांगितले की, “यशराजची कामगिरी केवळ तांत्रिक नाही, तर ती त्याच्या मनोबलाची ओळख आहे. सातत्यपूर्ण प्रयत्न, समर्पण आणि आत्मविश्वास या तीन गोष्टींनी तो इथवर पोहोचला आहे.”

नेमबाजी हा खेळ भारतात अजूनही उदयोन्मुख टप्प्यावर असला, तरी महाराष्ट्रातील तरुण नेमबाजांनी अलीकडच्या काळात राष्ट्रीय पातळीवर चांगली छाप पाडली आहे. या पार्श्वभूमीवर यशराज जवळकरचे हे यश राज्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे. अनेक नेमबाजी प्रेमी आणि क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञांनी त्याचे कौतुक करत, भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्याच्याकडून पदकांची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### स्पर्धेतील यशराजची पदक कमाई

२५ मीटर सेंटर फायर पिस्टल – सुवर्ण पदक
१० मीटर एअर पिस्टल (सब युथ) – सुवर्ण पदक
१० मीटर एअर पिस्टल (सिनियर कॅटेगरी) – सुवर्ण पदक
२५ मीटर स्टँडर्ड पिस्टल – कांस्य पदक
२५ मीटर स्पोर्ट्स पिस्टल – कांस्य पदक

# भारताकडे निसर्गासोबतचा शाश्वत जीवनमार्ग!

## डॉ. मोहन भागवत : कैवल्यधाम योग संशोधन संस्थेच्या 101 व्या स्थापना दिनानिमित्त सरसंघचालकांची भेट

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“भौतिक प्रगतीच्या नावाखाली निसर्गाचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी भारताने पुन्हा एकदा निसर्गाशी सुसंगत असा शाश्वत जीवनमार्ग स्वीकारणे गरजेचे आहे. सृष्टीच्या पोषणाचा विचार आपल्या योगशास्त्रात अंतर्भूत आहे. निसर्गासोबत जगण्याचा मार्ग भारताकडे आहे, आणि विश्वकल्याणासाठी तो जगासमोर मांडणे ही आपली जबाबदारी आहे,” असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.**




स्वामी कुवलयानंद यांनी स्थापन केलेल्या कैवल्यधाम योग संशोधन संस्थेच्या १०१ व्या स्थापना दिनानिमित्त लोणावळ्यात आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी महामंडलेश्वर स्वामी विश्वेश्वरानंद गिरीजी, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

### “योग म्हणजे शरीर, मन आणि आत्म्याचे संतुलन”

कार्यक्रमात बोलताना डॉ. भागवत म्हणाले, “योग हा केवळ व्यायाम नाही, तर तो शरीर, मन, बुद्धी आणि आत्म्याचे संतुलन साधणारा विज्ञानाधारित मार्ग आहे. कैवल्यधामने गेल्या शतकभरात योगशास्त्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर वैज्ञानिक चौकट दिली. योगाच्या माध्यमातून समाजात शांतता, समत्व आणि आत्मनियंत्रण निर्माण होत आहे. या मार्गाने जीवन जगणे म्हणजे निसर्गाशी सुसंगतपणे जगणे होय.”

ते पुढे म्हणाले, “विज्ञान आणि अध्यात्म हे परस्परविरोधी नाहीत. विज्ञान प्रयोगातून सत्य शोधते, तर अध्यात्म अनुभवातून. दोन्हींचा उद्देश माणसाच्या जीवनात ज्ञान आणि कल्याण निर्माण करणे हा एकच आहे. विज्ञान जितके सूक्ष्म कणांपर्यंत पोहोचते, तितकेच अध्यात्म मानवाच्या चेतनेच्या गाभ्यापर्यंत पोहोचते. भारताचे प्राचीन ज्ञान हे जगासाठी आजही मार्गदर्शक ठरू शकते.”

### शाश्वत विकासाचा भारतीय दृष्टिकोन

डॉ. भागवत यांनी आधुनिक विकासाच्या संकल्पनांवर भाष्य करताना म्हटले, “आज जगभर प्रगतीचे मोजमाप केवळ उपभोगावर केले जाते. मात्र निसर्गाचा ऱ्हास, प्रदूषण आणि मानसिक असंतुलन या भौतिक प्रगतीच्या दुष्परिणामांकडे आपण दुर्लक्ष केले. भारताने नेहमीच ‘विश्वबंधुत्व’ आणि ‘सर्वजनहिताय’ या तत्त्वांवर भर दिला आहे. आपल्याकडे निसर्गाशी संवाद साधणारी संस्कृती आहे. या संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रसार होणे आवश्यक आहे.”

त्यांनी पुढे सांगितले की, “आपल्या जीवनपद्धतीत बदल घडवून शाश्वततेकडे जाणे आवश्यक आहे. ही केवळ आर्थिक किंवा तांत्रिक गरज नाही, तर मानवी अस्तित्वाच्या टिकावाची गरज आहे. योग आणि आयुर्वेद या भारतीय परंपरा निसर्गासोबत जगण्याचे उत्तम उदाहरण आहेत.”

### समाजपरिवर्तनासाठी प्रेरणा

कार्यक्रमात बोलताना माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू म्हणाले, “कैवल्यधाम आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन्ही संस्था समाज परिवर्तनासाठी सातत्याने कार्यरत आहेत. योग हा केवळ आरोग्याचा नाही, तर राष्ट्रनिर्मितीचा मार्ग आहे. भारत जगाला अध्यात्मिक नेतृत्व देऊ शकतो.” कार्यक्रमाचा समारोप भारतीय संस्कृतीतील ‘सर्वे भवन्तु सुखिनः’ या श्लोकाच्या पठणाने झाला. उपस्थित मान्यवरांनी कैवल्यधामच्या कार्याचा गौरव करत, योगाच्या माध्यमातून निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा संदेश दिला.

### दोन पुस्तकांचे प्रकाशन

या कार्यक्रमात ‘योग पोलिस’ (लेखक डॉ. शरदचंद्र भालेकर) आणि ‘सात्विक आहार’ (लेखिका डॉ. ऋतू प्रसाद) या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकांद्वारे समाजात आरोग्य, शिस्त आणि नैसर्गिक जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण होईल, असे डॉ. भागवत यांनी सांगितले.

### कैवल्यधामची कार्यपरंपरा आणि योगदान

१९२४ साली स्वामी कुवलयानंद यांनी लोणावळ्यात कैवल्यधाम योग संशोधन संस्था स्थापन केली. योगशास्त्राच्या वैज्ञानिक अभ्यासाची ही पहिली भारतीय संस्था मानली जाते. संस्थेने शंभर वर्षांत योगाच्या संशोधन, अध्यापन आणि आरोग्य संवर्धनाच्या क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. सध्या संस्थेत विविध देशांतील शास्त्रज्ञ, योगाचार्य आणि विद्यार्थी संशोधन कार्यात सहभागी आहेत.

डॉ. भागवत यांनी या भेटीदरम्यान कैवल्यधामच्या विविध प्रयोगशाळांना भेट देत संशोधनाच्या प्रकल्पांची माहिती घेतली. योगशास्त्र आणि आधुनिक विज्ञान यांच्यातील समन्वय साधण्यासाठी संस्थेचे संशोधन महत्त्वाचे ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## दिवाळी ड्राइव्ह 2025 चे' आयोजन

# अन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले!

### शिक्षण विश्व :मास्टर माईंड स्कूलचा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**साई सोशल अँड स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने स्नेहवन आश्रम तसेच दिघी परिसरातील झोपडपट्टी भागात दिवाळी ड्राइव्ह उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.**



या उपक्रमांतर्गत गरजू नागरिकांना तसेच आश्रमातील विद्यार्थ्यांना चादरी, साड्या, मिठाईचे डबे व खाऊचे वाटप करण्यात आले. एकूण २६५ लाभार्थ्यांना या उपक्रमाचा प्रत्यक्ष लाभ मिळाला. यामध्ये स्नेहवन आश्रमातील मुले व दिघीतील झोपडपट्टीमधील कुटुंबांचा समावेश होता.

सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून आणि दिवाळीसारख्या प्रकाशाच्या सणानिमित्त, गरजूंना आधार देण्याचा व त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा मुख्य उद्देश या उपक्रमामागे होता. या उपक्रमास मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, नॅशनल ह्युमन राईट्स अँड अँटी करप्शन फोरम, बुधानी वेफर्स व अमर कुटे यांचे सहकार्य संस्थापक साई सोशल अँड स्पोर्ट्स फाउंडेशन अध्यक्ष फिरोज खान, मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज प्राचार्य डॉ. प्रदीपा नायर, पारुल गुप्ता, लीना बोरहाडे, कमलेश स्वामी, फिरोज खान यांच्यासह शालेय शिक्षकवृंद श्रेया चव्हाण, शीला शर्मा, अर्चना कुलकर्णी, मीनाक्षी नाईक, दीप्ती वालके उपस्थित होते.

> “ या उपक्रमातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, दिवाळीच्या आनंदात प्रत्येकाला सहभागी करून घेण्याचा संदेश दिला गेला.
>
> **- प्राचार्य डॉ. प्रदीपा नायर,**
> मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज

## नव तंत्रज्ञान आत्मसात करा

### अच्युत गोडबोले : पीसीसीओईआर मध्ये बीटेक प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**या पुढील काळात विज्ञान तंत्रज्ञानात प्रचंड वेगाने बदल होत आहे. अवघ्या काही महिन्यांत नव नवीन तंत्रज्ञान विकसित होत असून विद्यार्थ्यांनी ते आत्मसात करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत; तरच भविष्यात आश्वासक प्रगती साध्य करता येईल. मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विविध स्तरातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी केला पाहिजे, असे मार्गदर्शन ज्येष्ठ तंत्रज्ञ, मार्गदर्शक, लेखक अच्युत गोडबोले यांनी केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात बी. टेक. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात यावेळी अच्युत गोडबोले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. विजयकुमार जंगम शेट्टी, संग्राम निर्मळे, पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी, पीसीईटीट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, विद्यार्थी, पालक, विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी प्रथम वर्षात विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या नंतरच्या सत्रात प्रा. विजयकुमार जंगम शेट्टी, संग्राम निर्मळे, माजी विद्यार्थीनी कविता बाळीवाडा, सुहानी चालमेती यांनीही मार्गदर्शन केले.

#### समाजपरिवर्तनासाठी प्रेरणा

कार्यक्रमात बोलताना माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू म्हणाले, “कैवल्यधाम आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन्ही संस्था समाज परिवर्तनासाठी सातत्याने कार्यरत आहेत. योग हा केवळ आरोग्याचा नाही, तर राष्ट्रनिर्मितीचा मार्ग आहे. भारत जगाला अध्यात्मिक नेतृत्व देऊ शकतो.” कार्यक्रमाचा समारोप भारतीय संस्कृतीतील ‘सर्वे भवन्तु सुखिनः’ या श्लोकाच्या पठणाने झाला. उपस्थित मान्यवरांनी कैवल्यधामच्या कार्याचा गौरव करत, योगाच्या माध्यमातून निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा संदेश दिला.

विद्यार्थ्यांनी शिस्त, सातत्यपूर्ण ज्ञानार्जन, नवकल्पना आणि नैतिक मूल्ये जपली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक यश नव्हे तर समाजासाठी जबाबदार अभियंता होण्याचे आवाहन केले, डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी केले.

विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध अभ्यास, कौशल्य विकास, करिअरच्या संधींबाबत प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी मार्गदर्शन केले. पालकांसाठी विशेष संवाद सत्रही आयोजित करण्यात आले.

स्वागत प्रा. शीतल पाटील आणि आभार प्रा. प्रिया ओघे मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


www.rklgis.org
RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
Admission Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including: Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

## What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune